वाचले :-

१. लेखा विभागाकडील आदेश क्र.लेखा/१/कावि/४३८/२०१३ दि.०९/०७/२०१३
२. यमुनानगर रुग्णालयासंदर्भात मा.आयुक्त सो यांचेकडील दि.१६/०८/२०१३ रोजीचा मान्य प्रस्ताव
३. मा.आयुक्त सो यांचेकडील पत्र.क्र.जा.क्र.सुवि/१/कावि/२७७४/१३ दि.१७/०९/२०१३
४. दि. २५/०९/२०१३ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/१अ/कावि/८१६/२०१३
दि. २६/०९/२०१३

**विषय :- आहरण व वितरण अधिकारी निश्चितीबाबत**

दुरुस्त आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी आदेश क्र.लेखा/१/कावि/४३८/२०१३ दि.०८/०७/२०१३ अन्वये आहरण व वितरण अधिकारी यांच्या नेमणूक दि.०१/०८/२०१३ पासून करणेत आलेल्या आहेत. बांधकाम परवानगी विभागात कार्यकारी अभियंता पद नसलेने व आरोग्य मुख्य कार्यालय यांचे नाव वाचले क्र.१ चे आदेशात राहून गेलेने तसेच वाचले क्र.२ व ३ अन्वये यमुनानगर रुग्णालय व सुरक्षा विभाग या विभागांसंदर्भात मान्यता दिले प्रमाणे खालील दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | विभागाचे नाव | घोषित आहरण व वितरण अधिकारी | सुधारित आहरण व वितरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१ | बांधकाम परवानगी विभाग | कार्यकारी अभियंता | उप शहर अभियंता |
| ०२ | आरोग्य मुख्य कार्यालय | सहा.आरोग्य अधिकारी | आरोग्य कार्यकारी अधिकारी |
| ०३ | यमुनानगर रुग्णालय | जेष्ठ वैद्यकिय अधिकारी आकुर्डी रुग्णालय | जेष्ठ वैद्यकिय अधिकारी यमुनानगर रुग्णालय |
| ०४ | सुरक्षा विभाग | सहाय्यक आयुक्त(सुरक्षा) | सुरक्षा अधिकारी |

उपरोक्त वाचले क्र.१ वरील आदेशात उपरोक्त तक्त्यातील विभागासंदर्भात घोषित केलेले आहरण व वितरण अधिकारी यांना दिलेले अधिकार निरस्त करण्यात येत असून वरील तक्त्यातील रकाना क्र. ४ मधील सुधारित आहरण व वितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे तारखेपासून लागू राहील.

उपरोक्त प्रमाणे दिलेले अधिकार हे प्रशासकीय सोईसाठी निर्गत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे कोणत्याही अतिरिक्त सोई सुविधा यामुळे प्राप्त होणार नाहीत.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
सर्व संबंधित आहरण व वितरण अधिकारी

प्रत - १.विभागप्रमुख
२.मनपाचे सर्व संबंधित विभाग
३.मनपाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८